मटा फॅमिली

# गोष्ट... सेकंड चान्सची



**'दुसरा चान्स अवश्य घ्या; पण तुम्हाला बाळाची आवड असेल तरच. पहिल्या मुलाच्या समस्या दूर करण्यासाठी नको!'**

**डॉ. मीनल सोहनी**

'डॉक्टर,
आमची मुलगी ईशा आता चार वर्षांची झाली आहे. आम्हाला खरं तर दुसरं मूल नकोय; पण माझे आई-बाबा खूपच मागे लागलेत; दुसरा चान्स घ्याच म्हणून. म्हणताहेत की ईशा एकटी पडेल, मग समस्या येतील. आम्ही खूप गोंधळलोय डॉक्टर; काय करावं? तुम्हीच सांगा...'

तुषार आणि स्मिता काकुळतीने सांगत होते. दोघेही व्यस्त कम्प्युटर इंजिनीअर. घरात दोघंच. ईशा दिवसभर पाळणाघरात असते, मग आणखी एक मूल म्हणजे...!

हा प्रश्न फक्त तुषार आणि स्मिताचा नसून, आजचे बहुतांश तरुण पालक याच द्विधा मनःस्थितीत दिसतात. खरंच असं होतं का? या प्रश्नाचं उत्तर 'हो' असं आहे.

बऱ्याच वर्षांनी घरात पहिलं बाळ येतं, त्यामुळे आई-वडील, दोन्ही आजी-आजोबा त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव करतात. बाळाला रडवायचं नाही, म्हणून त्याला हवं ते दिलं जातं. त्यातून एकुलते एक, मग खाऊ, खेळणी, कपडे, रंगपेट्या, पेन्सिली यांचा वर्षाव होतो. मग असं होतं की या एकुलत्या एकाला 'नकार' पचवण्याची सवयच राहात नाही. मूल दिवसेंदिवस अधिकाधिक हट्टी बनत जातं. सतत आपल्याच मनासारखं घडलं पाहिजे, ही त्याची इच्छा घरी जरी पूर्ण झाली तरी शाळेत, बागेत, इतर ठिकाणी मित्र-मैत्रिणी थोडीच ही हुकूमशाही चालवून घेतील? मग या मुलांचं कुणाशीच पटेनासं होतं. जाईल तिथे भांडण होतं. मग आई-बाबाच या मुलाशी खेळायला सुरुवात करतात. साहजिकच खेळात नेहमी मूल जिंकतं, पालक हरतात. आता या मुलाला खेळातही खिलाडूपणा शिकता येत नाही. समाजात वावरताना नमते घ्यायची, जुळवून घ्यायची जी सवय या मुलांना लागायला हवी ती नसल्याने ही मुलं एकटी पडतात. घरीही भावंडं नसल्यामुळे पटवून घेण्याचा प्रश्नच येत नाही.

बहुतांश पालक आपल्या एकुलत्या अपत्याबद्दल अतीच दक्ष आणि हळवे असतात. ओव्हर प्रोटेक्टिव्ह आणि पझेसिव्ह. मुलांना थोडेसे टक्के-टोणपे खाऊन, थोडंसं नमतं घेऊन जे अनुभव मिळतात, तसे अनुभव हे पालक आपल्या मुलांना द्यायला घाबरतात. मुलांना सतत आपल्या पंखाखाली ठेवतात. साहजिकच पौगंडावस्थेत, पुढे कॉलेजमध्ये गेल्यावर ही मुलं जेव्हा बाहेरच्या जगात जातात, तेव्हा फारच कावरीबावरी होतात, घाबरतात, बुजतात. मग बऱ्याचदा ती इतरांच्या चेष्टेचा विषय बनतात.

काही मुलांच्या बाबतीत हा बुजरेपणा, एकलकोंडेपणा, हट्टीपणा, परिस्थितीशी जुळवून न घेता येणे याची परिणती पुढे मानसिक समस्यांमध्येही होऊ शकते. पण मग दुसरं मूल हा यावर उपाय होईल का, तर मुळीच नाही. मुळात या समस्या पालकांनी मुलांच्या एकुलतं असल्याचा फार बाऊ केला तर जास्त होतात. मूल एकटं असो की दुकटं, त्याच्यावर योग्य संस्कार करणं, शिस्त लावणं, बाहेरच्या जगात त्याला जुळवून घ्यायला शिकवणं, इतर भावंडांमध्ये त्याला रुळवणं या गोष्टी प्रत्येकच मुलासाठी आवश्यक आहेत.

दुसऱ्यांच्या घरी बाळ बघून प्रत्येकच मुलाला वाटतं की, आपल्याही आईने एक असंच बाळ आणावं; पण या छोट्या मुलासाठी ते बाळ म्हणजे फक्त जिवंत खेळणं असतं, खेळून झालं की बास्केटमध्ये जाणार! आई-वडिलांसाठी मात्र ती असते खूप महत्त्वाची जबाबदारी, तीही आयुष्यभराची! त्यामुळे एकट्या मुलालाही जबाबदारीनं, डोळसपणे वाढवणं हाच यावरचा खरा उपाय आहे.

तुषार आणि स्मिताला मी आवर्जून सांगितलं, 'दुसरा चान्स अवश्य घ्या; पण तुम्हाला बाळाची आवड आहे म्हणून. पहिल्या मुलाच्या समस्या दूर करण्यासाठी नको!'